मिरा भाईंदर महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

ज्ञानाच्या अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/ सा.प्र./ २७३ /२०२४-२५ दि. २० / ०१ /२०२५

## // परिपत्रक //

विषय:-मराठी भाषा प्रचार व प्रसारासाठीचे उपक्रम (कार्यक्रम) अंतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेसाठी मनपा कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी ग्रंथदिंडी व ग्रंथप्रदर्शन कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्रमांक: मभापं-२०२३/प्र.क्र. १३५/भाषा-२, दि.१९/१२/२०२३ मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय.

२) दि. १६/१२/२०२४ रोजीचे मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र.

राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे याहेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो. "मराठी भाषेचा प्रचार व प्रसार" या विभागाच्या मुख्य धोरणास अनुसरुन "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सुचना संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथुन गुरूवार दि. २३/०१/२०२५ रोजी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर ग्रंथदिंडीची सुरूवात मिभा.मनपा मुख्यालय येथुन सकाळी ठिक ९.०० वाजता होणार आहे. याकरिता ग्रंथदिंडीत लेझिम/ टाळ/ मृदुंग यामध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी आपली नावे दि.२१/०१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी यांचेकडे द्यावीत. ग्रंथदिंडीत लेझिम पथकात भाग घेणाऱ्या महिला व पुरूष अधिकारी/ कर्मचारी यांनी पारंपारीक वेशभुषेत यावे. ग्रंथदिंडीनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) येथील सभागृहात ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले आहे.

तरी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सदर कार्यक्रमास सकाळी ९.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयात उपस्थित रहावे ही विनंती.

20.1.2025

(स्वप्निल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका